# अद्वैत साळगावकरला युवा साहित्य पुरस्कार प्रदान




**पेडणे : युवा पुरस्कार अद्वैत साळगावकरला प्रदान करताना साहित्य अकादमीचे अध्यक्ष डॉ. माधव कौशिक सोबत इतर मान्यवर**

प्रतिनिधी
पेडणे

साहित्य अकादमी नवी दिल्ली पुरस्कृत युवा साहित्य पुरस्कार २०२४ चा पुरस्कार वितरण सोहळा दि. १२ रोजी सायंकाळी भुवनेश्वर ओडीसा येथे झाला. कोंकणी भाषेसाठी यंदाचा युवा पुरस्कार 'पेडण्याचा सांमारा' या पुस्तकासाठी कोरगावचे सुपुत्र युवा लेखक अद्वैत साळगावकर यांना प्रदान करण्यात आला.

साहित्य अकादमीचे अध्यक्ष डॉ. माधव कौशिक यांच्याहस्ते हे पुरस्कार प्रदान करण्यात आले.

यावेळी प्रमुख अतिथी म्हणून इंग्रजीतील नामवंत कवी व लेखक जेरी पिंटो उपस्थित होते. तसेच साहित्य अकादमी नवी दिल्लीचे सचिव व उपसचिव आदी व्यासपीठावर उपस्थित होते.